Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 10 January 2025

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: १० जानेवारी २०२५ सकाळी ११.०० वाजता.**

****

प्रवासी भारतीय दिवस संमेलनाचा आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत समारोप होणार आहे. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या परदेशी भारतीयांना राष्ट्रपती प्रवासी भारतीय सन्मान आज प्रदान करण्यात येणार आहे.

****

महाकुंभ २०२५ ला समर्पित आकाशवाणीच्या विशेष कुंभवाणी वाहिनीचं उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या हस्ते आज लोकार्पण झालं. प्रसार भारतीचे अध्यक्ष नवनीत कुमार सेहगल, मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी यावेळी उपस्थित होते. महाकुंभ जात, पंथ आणि भेदभावाच्या पलिकडे असून, एकतेचा संदेश देत असल्याचं योगी आदित्यनाय यावेळी म्हणाले. केंद्रीय माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री एल मुरुगन दूरदृश्य संवाद प्रणालीच्या माध्यमातून या कार्यक्रमात सहभागी झाले होते. कुंभवाणी या वाहिनीवर आजपासून २६ फेब्रुवारीपर्यंत महाकुंभमेळ्यात होणाऱ्या सर्व कार्यक्रमांचं प्रक्षेपण केलं जाईल. या वाहिनीवर अमृतस्नानाचं थेट प्रसारण देखील ऐकता येईल. आकाशवाणीच्या १०३ मेगाहर्टझ लहरींवरून, 'न्यूज ऑन ए आय आर' ॲप वरून, तसंच 'वेव्ज' या ओ टी टी मंचावरून कुंभ वाणी चं प्रसारण ऐकता येईल.

****

'परीक्षा पे चर्चा'च्या आठव्या आवृत्तीसाठी भारत आणि परदेशातले विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांकडून दोन कोटी ७० लाखाहून अधिक नोंदणी करण्यात आली आहे. या कार्यक्रमासाठी ऑनलाईन नोंदणी माय जी ओ व्ही डॉट इन वर सुरु असून, १४ जानेवारी पर्यंत नोंदणी सुरु राहणार आहे.

****

शाश्वत भविष्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दृष्टिकोनाला अनुसरून, २०३० सालापर्यंत ५० टक्के बिगर जीवाश्म इंधनाचा पर्याय स्वीकारण्यासाठी भारत वचनबद्ध असल्याचं, केंद्रीय नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्री प्रल्हाद जोशी यांनी म्हटलं आहे. ते काल मुंबईत नवीकरणीय ऊर्जा या विषयावर आयोजित कार्यशाळेच्या उद्घाटन सत्रात बोलत होते. जगभरात हरित ऊर्जेपासून बनवलेल्या उत्पादनांची वाढती मागणी लक्षात घेता, आपल्या नवीकरणीय ऊर्जा स्रोतांचा पुरेपूर लाभ घेण्याचं भारताचं उद्दिष्ट असल्याचं जोशी यांनी सांगितलं.

****

छत्तीसगडमध्ये सुकमा जिल्ह्यात काल सुरक्षा दलांबरोबर झालेल्या चकमकीत तीन नक्षलवादी ठार झाले. सुकमा आणि विजापूर या जिल्ह्यांच्या सीमेवरच्या जंगलात जिल्हा राखीव पोलीस दल, विशेष कृती दल आणि कोब्रा बटालियनचं संयुक्त पथक नक्षली विरोधी मोहिमेवर असताना ही चकमक सुरू झाली.

****

शेतकऱ्यांनी पिकवलेल्या तृणधान्याला योग्य बाजारपेठ उपलब्ध करून देण्याची जबाबदारी पणन विभागाची आहे, असं पणनमंत्री जयकुमार रावल यांनी म्हटलं आहे. ते काल पुण्यात पणन मंडळाच्या वतीनं आयोजित भरडधान्य महोत्सवाचं उद्घाटन करताना बोलत होते. भरडधान्य जनजागृतीसाठी काढलेल्या दुचाकी फेरीलाही रावल यांनी हिरवा झेंडा दाखवला. राज्याच्या विविध भागातून भरडधान्य उत्पादक, प्रक्रिया उद्योगामध्ये कार्यरत असणारे बचतगट, सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, स्टार्ट अप कंपन्या यात सहभागी झाल्या आहेत.

****

राज्यात अनधिकृत मासेमारी नौकांवर नजर ठेवण्यासाठी ड्रोनच्या सहायानं देखरेख ठेवणारी डिजिटल डेटा मेंटेनन्स यंत्रप्रणाली राबवायला कालपासून सुरुवात झाली. मत्स्यव्यवसाय आणि बंदरमंत्री नितेश राणे यांनी मुंबईतल्या आयुक्त कार्यालयात नियंत्रण कक्षाचं उद्घाटन केलं. मुंबई शहरात ससून गोदी, मुंबई उपनगरात गोराई, ठाण्यात उत्तन, पालघरमध्ये शिरगाव, रायगड जिल्ह्यात वर्सोली आणि श्रीवर्धन, रत्नागिरीत भाट्ये आणि मिरकरवाडा, तसंच सिंधुदुर्गात देवगड, अशा नऊ ठिकाणी ड्रोनद्वारे देखरेख ठेवली जाणार आहे.

****

नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने पाच लाख ३० हजार ४५ शेतकऱ्यांना ५३५ कोटी ६५ लाख ७४ हजार ८९३ रुपयांची मदत वितरित केली आहे. मदतीची ही रक्कम थेट आपदग्रस्त लाभार्थी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आली असल्याची माहिती, मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी दिली. यामध्ये छत्रपती संभाजीनगर विभागात लातूर जिल्ह्यातल्या एक लाख ६८ हजार ८९ शेतकऱ्यांना १७८ कोटी ६५ लाख रुपये, परभणी जिल्ह्यातल्या एक लाख १२ हजार ६४८ शेतकऱ्यांना १२१ कोटी ६४ लाख, बीड जिल्ह्यातल्या ३९ हजार ९३ शेतकऱ्यांना ३० कोटी २२ लाख, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या तीन हजार ६१९ शेतकऱ्यांना ३ कोटी २३ लाख, हिंगोली जिल्ह्यातल्या दोन हजार ४०८ शेतकऱ्यांना एक कोटी ६३ लाख, नांदेड जिल्ह्यातल्या एक हजार ८८६ शेतकऱ्यांना १ कोटी ५८ लाख, जालना जिल्ह्यातल्या एक हजार ५९० शेतकऱ्यांना १ कोटी ५७ लाख, तर धाराशिव जिल्ह्यातल्या ३४२ शेतकऱ्यांना ३२ लाख ५० हजार १४८ रुपये वितरीत करण्यात आले आहेत.

****

बुलडाणा जिल्ह्यात शेगाव तालुक्यात पूर्णा नदीकाठच्या विविध गावांमध्ये नागरिकांच्या डोक्यावरील केस गळतीचं प्रमाण अचानक मोठ्या प्रमाणावर वाढल्याने आरोग्य विभागानं त्वचारोग तज्ज्ञांच्या माध्यमातून सर्वेक्षण सुरू केलं आहे.

****